# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

म वि नि आ

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
**दूरध्वनी:** ०२२-२२१६३९६४/२२१६३९६५ / २२१६३९६९
**संकेत स्थळ:** www.merc.gov.in **ई-मेल:** mercindia@merc.gov.in

**जाहिरात क्र. १८/२०२०-२१**

## जाहीर सूचना

### (सन २०२० चे प्रकरण क्र. १४१)

### खारघर विक्रोळी ट्रान्समिशन प्रायव्हेट लिमिटेडने पारेषण परवाना मंजूर करण्यासाठी केलेल्या अर्जावर विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४, १५ आणि ८६(१)(डी) अंतर्गत सूचना/हरकती मागविण्यासाठी

१. मे. खारघर विक्रोळी ट्रान्समिशन प्रायव्हेट लिमिटेडने (केव्हीटीपीएल) पारेषण परवाना मंजूर करण्यासाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे (आयोग) दि. ७ जुलै, २०२० रोजी विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४, १५ आणि ८६(१)(डी) आणि मविनिआ (पारेषण परवान्याच्या अटी) विनियम, २००४ मधील तरतुदींतर्गत अर्ज दाखल केला आहे. आयोगाने दि. २८ जुलै, २०२० रोजी सदर अर्ज सन २०२० च्या प्रकरण क्र. १४१ अंतर्गत दाखल करुन घेतला आहे.

२. मुंबईच्या पारेषण यंत्रणेच्या बळकटी करण्यासाठी ४०० केव्ही विक्रोळी पारेषण प्रकल्प प्रारंभी टाटा पॉवर कंपनी-पारेषण (टीपीसी-टी) यांना सन २०११ मध्ये आयोगाच्या मान्यतेनुसार देण्यात आली होता. तथापि, योजना पूर्ण करण्यात झालेल्या अमर्याद विलंबामुळे, आयोगाने सन २०१७ च्या प्रकरण क्र. २०४ मध्ये दि. १२ सप्टेंबर, २०१८ रोजी दिलेल्या आदेशान्वये ही योजना वीज दरावर आधारीत स्पर्धात्मक बोली (टीसीबीसी) अंतर्गत पूर्ण करण्याचे निश्चित केले.

३. महाराष्ट्र शासनाने शक्तिप्रदान समिती (इसी) गठीत करुन, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेडला (महापारेषण कंपनी) या प्रकल्पासाठी बोली प्रक्रिया समन्वयक (बीपीसी) म्हणून नियुक्त केले. शक्तिप्रदान समितीने वीज दरावर आधारित स्पर्धात्मक बोली प्रक्रियेच्या (टीबीसीबी) माध्यमातून यशस्वी बोलीदाराच्या निवडीसाठी हा पारेषण प्रकल्प बीपीसीकडे सोपविला.

४. बीपीसीने टीबीसीबी प्रक्रियेद्वारे यशस्वी बोलीदार मिळाल्यानंतर पारेषण सेवा पुरवठादार (टीएसपी) म्हणून काम पाहण्यासाठी कंपनी अधिनियम, २०१३ अंतर्गत दि. १३ मे, २०१९ रोजी संपूर्ण मालकीची केव्हीटीपीएल (अर्जदार) उपकंपनी विधीसंस्थापित केली.

५. योजनेच्या प्रस्तावासाठीच्या विनंतीचे (आरएफपी) दस्तऐवज दि. २२ जून, २०१९ रोजी निर्गमित करण्यात आले आणि केव्हीटीपीएल व दीर्घ-कालिन पारेषण ग्राहक (एलटीटीसी) यांच्यामध्ये पारेषण सेवा करार (टीएसए) १४ ऑगस्ट २०१९ रोजी स्वाक्षांकित करण्यात आला. स्वाक्षांकित केलेल्या टीएसए नुसार पारेषण योजनेची व्याप्ती खालील तक्त्यात दर्शविण्यात आली आहेः-

| अनु. क्र. | "मुंबईची पारेषण यंत्रणा बळकट करण्यासाठी ४०० केव्ही विक्रोळी रिसिव्हिंग स्टेशन आणि संलग्न प्रवेशी पारेषण वाहिन्या" पारेषण योजनेची व्याप्ती |
|---|---|
| १ | खारघर येथे ४०० केव्ही खारघर-विक्रोळी डी/सी आणि एम/सी वाहिनी (Twin एचटीएलएस कण्डक्टरसह) - २१.१ किमी; |
| २ | ४०० केव्ही विक्रोळी जीआयएस उप-केंद्रात ४०० केव्ही तळेगाव-कळवा वाहिनीवर LILO- १४.२२४ किमी |
| ३ | ३ x ५०० एमव्हीए, ४००/२२० केव्ही आयसीटी आणि २ x २५० एमव्हीए, २२०/११०/३३ केव्ही आयसीटी |
| ४ | ४०० केव्ही जीआयएस बेज - १४ आणि २२० केव्ही जीआयएस बेज - २१ |
| ५ | विक्रोळी उप-केंद्रात ४०० केव्ही जीआयएस आणि २२० केव्ही जीआयएसचे बांधकाम |
| ६ | ४००/२२० केव्ही विक्रोळी उप-केंद्रात ९.५ किमी २२० केव्ही केबल टाकून, विद्यमान २२० केव्ही ट्रॉम्बे-सालसेट I आणि II चे आणि २२० केव्ही ट्रॉम्बे - सालसेट III आणि IV चे LILO |
| ७ | भविष्यातील अद्ययावतीकरणाचा विचार करुन, विद्यमान ११० केव्ही धारावी- सालसेट विक्रोळी वाहिन्यांमार्गे वळविण्यासाठी ५ किमी २२० केव्ही केबल आणि उपसाधने |
| ८ | १ x २५ एमव्हीएआर ४०० केव्ही बस रिॲक्टर उभारणे |

६. बीपीसीने आयोजित केलेल्या स्पर्धात्मक बोली प्रक्रियेच्या संदर्भात, मे. अदानी ट्रान्समिशन लिमिटेडला (एटीएल) यशस्वी बोलीदार म्हणून घोषित करण्यात आले. त्यानुसार, दि. १२ डिसेंबर, २०१९ रोजी एटीएलच्या नावे आशय पत्र (LoI) निर्गमित करण्यात आले. त्यानंतर, एटीएलने भाग खरेदी कराराची अंमलबजावणी करुन आणि बोली दस्तऐवजांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व प्रक्रियात्मक आवश्यकतांची पूर्तता करुन, दि. २५ जून, २०२० रोजी अर्जदाराचे अधिग्रहण केले.

७. आरएफपीच्या खंड १.५ (बी)(सी) आणि (डी) नुसार, बीपीसीला परवाने, जमिनीच्या परवानग्या आणि मंजुऱ्या यांचे 'टीपीसी-टी'कडून 'केव्हीटीपीएल' यांच्याकडे हस्तांतरण सुकर करणे आवश्यक आहे. त्याचे अवलोकन करुन, बीपीसीने दि. १४ ऑक्टोबर, २०२० रोजीच्या पत्र क्र. MSETCL/CO/BDC/TBCB/4087 अन्वये टीपीसी-टी यांना आयोगाच्या निर्देशांचे पालन करण्याची आणि प्रकल्प वेळेत पूर्ण होण्यासाठी प्रकल्पाशी संबंधित दस्तऐवज, खारघर आणि विक्रोळी येथील जमिनीचे हस्तांतरण, मंजुऱ्यांसाठीची सर्व ना हरकत प्रमाणपत्रे, परवाने आणि प्रकल्पाशी संबंधित अन्य कोणतेही दस्तऐवज केव्हीटीपीएलला ताबडतोब सुपूर्द करण्याची विनंती केली.

८. केव्हीटीपीएलने, मविनिआ (पारेषण परवान्याच्या अटी) विनियम, २००४ सह विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १५ च्या उप-कलम (२) नुसार, आपल्या पारेषण परवाना अर्जाची सूचना 'फायनान्शियल एक्सप्रेस' आणि 'फ्री प्रेस जर्नल' या दोन इंग्रजी वृत्तपत्रांमध्ये आणि 'लोकमंथन' आणि 'नवशक्ती' या दोन मराठी वृत्तपत्रांमध्ये दि. ३१ जुलै, २०२० रोजी प्रसिध्द् केली आहे.

९. केव्हीटीपीएलने उपरोक्त अर्जाबाबत वृत्तपत्रांमध्ये दिलेल्या सूचनेच्या संदर्भात राज्य पारेषण कंपनी (एसटीयु), महावितरण कंपनी आणि बेस्ट उपक्रम यांच्याकडून सूचना आणि हरकती प्राप्त झाल्या आहेत.

१०. एसटीयुने दि. ७ ऑगस्ट, २०२० च्या पत्रान्वये, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ (४) अंतर्गत केव्हीटीपीएल यांना पारेषण परवाना मंजूर करण्याची शिफारस केली आहे.

११. आयोगाने सन २०१४ च्या प्रकरण क्र. ११२ मधील (पारेषण परवान्याच्या मंजुरीसाठी टीपीसी-टी ची याचिका) प्रक्रियेदरम्यान दि. ११ जुलै, २०१४ च्या पत्र क्र. मविनिआ/प्रकरण क्र. २०१४ चे ११२/००७०१ अन्वये संरक्षण मंत्रालय, नागरी उड्डाण मंत्रालय आणि नौपरिवहन (शिपिंग) मंत्रालय यांना, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १५ नुसार, त्यांचे ना हरकत प्रमाणपत्र मिळण्याकरिता पत्रव्यवहार केला होता. आता, सदर प्रकल्प, ४०० केव्ही तळेगाव-पडघेवर LILO ४०० केव्ही विक्रोळी उप-केंद्रामध्ये, या अतिरिक्त व्याप्तीसह 'टीपीसी-टी'चा उत्तराधिकारी म्हणून केव्हीटीपीएल करीत असल्यामुळे आणि आयोगाला त्यासाठी पारेषण परवाना निर्गमित करणे आवश्यक असल्यामुळे, आयोगाने संरक्षण मंत्रालय, नागरी उड्डाण मंत्रालय आणि नौपरिवहन (शिपिंग) मंत्रालय, जसे असेल तसे, यांना पुनःपुष्टी किंवा ना हरकत प्रमाणपत्र मिळण्याची विनंती करण्याकरिता पत्र पाठविले आहे.

१२. केव्हीटीपीएल आणि बीपीसी यांनी सादर केलेल्या दस्तऐवजांचे विश्लेषण केल्यानंतर, आयोगाची सकृतदर्शनी खात्री झाली आहे की, वेळोवेळी सुधारणा केलेल्या, **मविनिआ (पारेषण परवान्याच्या अटी) विनियम, २००४ च्या भाग २ मधील पर्याय २** अंतर्गत केव्हीटीपीएल पारेषण परवाना मंजुरीसाठी पात्र आहे.

१३. विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम (१५)(५) च्या खंड (ए) अंतर्गत आयोगाने अर्जदाराला पारेषण परवाना मंजूर करण्याच्या प्रस्तावासंबंधात सूचना आणि/किंवा हरकती, असल्यास, त्या मागविण्यासाठी याद्वारे सूचना देण्यात येत आहे.

१४. केव्हीटीपीएलने आयोगाला सादर केलेल्या अर्जाची प्रत त्यासोबतच्या जोडपत्र आणि सहपत्रांसह आयोगाच्या www.merc.gov.in या संकेत-स्थळावर किंवा कोणत्याही व्यक्तिला, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (कामकाज प्रचालन) विनियम, २००४ मध्ये विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीचे पालन करुन आयोगाच्या कार्यालयात पाहता येईल.

१५. प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहीर सूचनेच्या संबंधात, इच्छुक व्यक्तिंनी ही सूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून दि. २० डिसेंबर २०२० रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत किंवा त्या पूर्वी त्यांच्या सूचना/हरकती, असल्यास, इंग्रजी किंवा मराठी भाषेत, सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग यांना १३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई-४००००५ या पत्यावर इलेक्ट्रॉनिक माध्यम **ehearing@merc.gov.in / secretary@merc.gov.in** ई-मेलद्वारे पाठवाव्यात. विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकानंतर प्राप्त झालेल्या सूचना आणि/किंवा हरकती विचारात घेण्यात येणार नाहीत.

१६. वरील परिच्छेद १५ नुसार, अभिप्राय/हरकती पाठविणाऱ्या व्यक्तिला त्याचे म्हणणे जाहीर ई-सुनावणीमध्ये व्यक्तिशः आयोगासमोर मांडावयाचे असल्यास सूचना/हरकती दाखल करताना तसे विशेषत्वाने नमूद करावे. अशा प्रकरणी, वैध ई-मेल आयडी आणि मोबाईल क्रमांक देणे अनिवार्य राहील. आयोग, आपल्या स्वेच्छानिर्णयानुसार, अशा प्रेषक/आक्षेपकाला ई-सुनावणीमध्ये त्याचे म्हणणे मांडण्याची परवानगी देईल. ई-सुनावणीमध्ये भाग घेणारे सर्व उपस्थित आयोगाने व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे जाहीर सुनावणीस हजर राहण्यासाठी दि. १७ सप्टेंबर, २०२० रोजी अधिसूचित केलेल्या मार्गदर्शक सूचनांमधील तरतुदींचे अनुसरण करतील.

१७. दि. ३० डिसेंबर, २०२० रोजी १०.३० वाजता व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे घेण्यात यावयाच्या सुनावणीमध्ये केव्हीटीपीएलच्या पारेषण परवान्याच्या मंजुरीसाठीचा अर्ज विचारात घेण्यात येईल. या प्रयोजनासाठी वेगळी सूचना देण्यात येणार नाही.

**दिनांक : २१ नोव्हेंबर, २०२०** | **सचिव,**
**ठिकाण : मुंबई** | **महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**

**Size : 12 (W) x 33 (H) = 396 SQCM**